अमरावती जिल्हयातील सन २००७ मधील अतिवृष्टी/पुरामळे बाधित पूर पुनर्वसित भागात नागरी सुविधा कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

मौजे देवरी,रेवसा,पुसदा व देवरा, तालुका-अमरावती, जिल्हा-अमरावती

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक एफएलडी-२०१९/प्र.क.२६/र-१२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय,मुंबई ४०० ०३२

दिनांक : ११/०९/२०१९

वाचा:-

१) शासन निर्णय , महसल व वन विभाग, क्र. आरसीपीए२८/प्र.क्र.५५०/र-१,दि.१-०८-२००९

२) शासन निर्णय , महसूल व वन विभाग, क्र. आरसपीए०१११/प्र.क्र.१८/र-१, दिनां २८-०३.२०११

३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. आव्यप्र२१/प्र.क्र.९७/आव्यप्र-२,दि.२-०९-२०१४

४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र२०१३/प्र.क्र.३०/२१३/विनियम, भाग-२,दिनांक १७-०४-२०१५

५) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. विअसु२०१५/प्र.क्र.२१८/इमारती-२,दि.१६-१२-२०१५

६) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.विअप्र२०१५/प्र.क्र.२०/२०१५/विनियम, दि.१९-०१-२०१६

७) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्र. उपायु/भु.सं.१/पुनर्व/क.लि./कावि-७०/१८, दि.२७-०२-२०१८

८) शासन पत्र, महसूल व वन विभाग क्र. एफएलडी२०१९/प्र.क.२६/र-१२,दि.१६-०३-२०१९

९) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्र. उपआ/पुनर्व/मुसं-१/कलि/कावि-२६५/२०१९, दि.०६-०६-२०१९

प्रस्तावना:-

शासन निर्णय दि.०२-०९-२०१४ अन्वये, अमरावती जिल्हयातील सन २००७ मधील अतिवृष्टी/ पुरामुळे बाधित झालेल्या गावांचे पुनर्वसन व घरांची पुनर्बांधणी करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने विभागीय आयुक्त, अमरावती यांनी संदर्भ क्रमांक ७ येथील पत्रान्वये सदर पुनर्वसित भागातील नागरी पुरवठा कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावातील असलेल्या त्रृटींची पुर्तता करण्याबाबत संदर्भ क्र.८ येथील शासन पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन विभागीय आयुक्त, अमरावती यांनी संदर्भ क. ९ येथील दिनांक ०६-०६-२०१९ अन्वये त्रृटींची पुर्तता करुन शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

२. याबाबत संदर्भाधीन क्र. ४ व ६ च्या शासन निर्णयान्वये वित्त विभागाकडून वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-एक ते पाच अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. सदर सुधारणांनुसार व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८ मधील भाग पहिला, उपविभाग-तीन, अनुक्रमांक ४ परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अनुसार योजनेला किंवा प्रस्तावाला प्रशासकीय (वित्तीय मंजुरी धरुन) मान्यता दण्याबाबत प्रशासनिक विभागास असलेल्या

अधिकारानुसार , पुनर्वसन धोरणानुसार देय नागरी सुविधा कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

अमरावती जिल्हयातील अमरावती तालुक्यातील सन २००७ मधील अतिवृष्टी/पुरामळे बाधित पूर पुनर्वसित गावामधील सोबतच्या विवरणपत्रामध्ये नमूद ४ नागरी सुविधा कामांच्या एकूण रु. २,८०,६५,०००/- **(अक्षरी दोन कोटी ऐंशी लक्ष पासष्ट हजार फक्त)** इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) प्रस्तावात समाविष्ट असलेल्या कामांकरिता गौण खनिज स्वामित्वधनाची वसुली करण्याची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

२) शासन निर्णय क्र. आरसीपीए२००८/प्र.क्र.५५०/र-१, दि.१-०८-२००९ व दि.२८-०३-२०११ अन्वये पुनर्वसित/ विस्तारित गावठाणातील नागरी सुविधा पुरविण्यासाठी निर्धारित करण्यात आलेल्या भौतिक मानकांनुसार काम करुन घेण्याची जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंता यांची राहील.

३) प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामांवर होणारा खर्च मंजूर अंदाजपत्रकांपेक्षा /विहित मर्यादेपेक्षा जास्त होणार नाही याची संबंधित कार्यकारी अभियंता यांनी दक्षता घ्यावी.

४) प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामांसाठीच्या अंदाजपत्रकांत दर्शविलेली कामनिहाय रक्कम तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेनुसार असावी. तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेतील अटींचे विहित कार्यपध्दतीनुसार पालन होईल, याची संबंधित कार्यकारी अभियंता यांनी दक्षता घ्यावी.

५) संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम,१९९९ मधील कलम १८ अन्वये प्रस्तावाधीन नागरी सुविधा सर्व दृष्टिने पूर्ण झाल्यावर व त्याप्रमाणे जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडून प्रमाणपत्र घेतल्यानंतर संबंधित जिल्हा परिषेदकडे तातडीने हस्तांतरित कराव्यात.

६) प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामांचा उचित दर्जा राखला जाईल, याची प्रकल्पयंत्रणेने दक्षता घ्यावी.

२. **निविदा प्रक्रिया व कार्यारंभ आदेशः-**

अ) कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, अमरावती यांनी प्रस्तुत प्रशासकीय मान्य्ता आदेशातील अटींची पुर्तता करुन प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामांची निविदा प्रक्रिया तात्काळ सुरु करावी.

ब) कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, अमरावती यांनी प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निविदा प्राप्त कामांसाठीचे कार्यारंभ आदेश देऊन नागरी सुविधा कामे तात्काळ सुरु करावीत.

३. उपरोक्त नागरी सुविधा कामांवरील खर्च **" मागणी क्रमांक सी-६,२२४५-नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य-०२ पूर, चक्रीवादळे इत्यादि, १०१, अनुग्रह सहाय्य (९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकाव्यतिरिक्त खर्च , (९२)(०४) पुरामुळे बाधित झालेल्या व्यक्तिंच्या पुनर्वसनाकरिता रस्ते,**

पाणी पुरवठा , शाळा चावडी, विदयुत पुरवठा, नागरी सुविधावरील खर्च (अनिवार्य) (दत्तमत)(२२४५ २२२९) ३१- सहायक अनुदाने (वेतनेतर) " या लेखाशिर्षाखाली उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीमधून करण्यात यावा.

४. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, अमरावती यांनी उपरोक्त लेखाशिर्षाखाली निधी उपलब्ध आहे, याची खात्री करुन नागरी सुविधा कामांचे कार्यारंभ आदेश द्यावेत. सदरची नागरी सुविधांची कामे निधी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आर्थिक वर्षात पूर्ण करण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता यांची राहील. सदरच्या सुविधा कामांसाठी वितरीत करण्यात आलेल्या निधीच्या अनुषंगाने प्रलंबित उपयोजन प्रमाणपत्रे (Utilisation Certificates) प्राथम्याने सादर करावीत.

५. सदर शासन निर्णय , महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१११९३२१८४८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Dayanand S Munjale

Digitally signed by Dayanand S Munjale
DN: CN = Dayanand S Munjale, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Revenue And Forest Department
Date: 2019.09.11 19:43:31 +05'30'

(द.शं.मुंजाळे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) विभागीय आयुक्त तथा मुख्य नियंत्रण अधिकारी (पुनर्वसन) अमरावती विभाग,अमरावती
२) उप आयुक्त (पुनर्वसन), अमरावती विभाग,अमरावती
३) जिल्हाधिकारी तथा पुनर्वसन उपसंचालक,अमरावती
४) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,अमरावती
५) कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग,अमरावती
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य ,मुंबई -१ / नागपूर-२ (२ प्रतीत)
७) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य ,मुंबई -१ / नागपूर-२ (२ प्रतीत)
८) जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती
९) वित्त विभाग,कार्यासन व्यय १०/ अर्थसंकल्प ६, मंत्रालय,मुंबई ४०० ०३२
१०) कार्यासन अधिकारी, कार्यासन ब-१/ कार्यासन -पी.ए.सी. , महसूल व वन विभाग,मंत्रालय, मंबई ४०० ०३२
११) निवड नस्ती,कार्यासन र-१२, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मंबई ४०० ०३२

****

विवरणपत्र

अमरावती जिल्हयातील अमरावती तालुक्यातील सन २००७ मधील अतिवृष्टी/पुरामळे बाधित पूर पुनर्वसित गावामधील नमूद ४ नागरी सुविधा कामांचा तपशील.

अ.क्र.	पुनर्वसित गाव	नागरी सुविधा कामांचा तपशील	अंदाजपत्रकीय तपशील रुपये
१	देवरी	अंतर्गत रस्ते/नालीचे बांधकाम करणे.	७२,१८,०००/-
२	रेवसा	अंतर्गत रस्ते/नालीचे बांधकाम करणे.	९२,२४,०००/-
३	पुसदा	अंतर्गत रस्ते/नालीचे बांधकाम करणे.	८४,२३,०००/-
४	देवरा	अंतर्गत रस्ते/नालीचे बांधकाम करणे.	३२,००,०००/-
		एकूण	२,८०,६५,०००

Dayanand S Munjale

Digitally signed by Dayanand S Munjale
DN: CN = Dayanand S Munjale, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Revenue And Forest Department
Date: 2019.09.11 19:45:07 +05'30'

(द.शं.मुंजाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन